



# पारनेर दर्शन






वर्ष १ अंक २८७, शुक्रवार २ ऑगस्ट २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# डॉ.सुजय विखे विधानसभा निवडणूकीच्या तयारीत!

## ■ राहुरी किंवा संगमनेरमधून लढण्याचे संकेत
## ■ उत्तरेच्या राजकारणाचे समीकरण बदलणार?

शिर्डी : प्रतिनिधी

**मला आता वेळ आहे, शेजारी कुठे संधी मिळाली तर विधानसभा लढविण्याचा माझा प्रयत्न असणार आहे. ज्या तालुक्यात उमेदवारी बाबत समन्वय होणार नसेल अशा मतदार संघात माझ्या नावावर एकमत झाल्यास मी निश्चित निवडणूक लढविण्यास तयार आहे. श्रीरामपूर राखीव असल्याने संगमनेर आणि राहुरी हाच माझ्यासमोर पर्याय असल्याचे सुचक वक्तव्य डॉ.सुजय विखे पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केले.**

डॉ.सुजय विखे पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधताना शिर्डी विधानसभा मतदार संघात सुरु असलेल्या दौऱ्यांबाबत काही गोष्टी स्पष्ट केल्या. या मतदार संघातून ना.राधाकृष्ण विखे पाटील हेच निवडणूक लढविणार असून, आमच्या कुटूंबाच्या दृष्टीने सुध्दा सर्वपरी तेच आहेत. त्यामुळे मी शिर्डी मधून निवडणूक लढवेल ही चर्चा निष्फळ आहे. लोकतांत्रिक प्रक्रीयेत सर्वांनाच उमेदवारी मागण्याचा आधिकार आहे. भारतीय जनता पक्षाचे वैशिष्ट हेच आहे. पक्षाकडे सामान्य कार्यकर्ता उमेदवारी मागू शकतो. नगर दक्षिणमध्ये आ.राम शिंदे यांच्यासह अनेकजण इच्छुक होते. त्याच पध्दतीने विधानसभेला कोणी उमेदवारी बाबत इच्छा व्यक्त केली असेल तर, यात गैर काही नाही अशी प्रतिक्रीया त्यांनी व्यक्त केली.

विधानसभा निवडणूक लढविण्याच्या प्रश्नावर बोलताना डॉ.सुजय विखे पाटील म्हणाले की, उत्तर भागामध्ये श्रीरामपूर मतदार संघ हा राखीव आहे. कोपरगावचे राजकारण खुप क्लिष्ट आहे. त्यामुळे राहुरी आणि संगमनेर हेच पर्याय माझ्यासमोर आहेत. कारण याही तालुक्यात अनेकजण इच्छुक आहेत. त्यांच्यात एकमत झाले नाही आणि माझ्या नावावर एकमत होत असेल तर आपण तयार आहोत. माझे काम फक्त अर्ज करण्याचे आहे. पक्षाने आदेश दिला तर, त्यानुसार आपण पुढे निर्णय करणार असल्याचे सुचक वक्तव्य यांनी केले.



### तनपुरे विरुद्ध विखे लढत?

डॉ.सुजय विखे यांनी राहुरी विधानसभा लढवल्यास आ.प्राजक्त तनपूरे विरूद्ध डॉ.सुजय विखे अशी लढत होणार आहे. तर डॉ. सुजय विखे यांनी संगमनेर किंवा राहुरी विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढण्याची इच्छा देखील पक्षाकडे व्यक्त केली आहे. डॉ.सुजय विखे पाटील हे संगमनेर विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीसाठी उभे राहिले तर त्याचा थेट सामना बाळासाहेब थोरात यांच्यात रंगू शकतो. लोकसभेला राहुरीत विखे यांना मानणारा मोठा गट असला तरी यंदाच्या निवडणुकीत या गटात पडलेली फूट विखेंचे मताधिक्य घटण्यास कारणीभूत ठरली.

### विखे संगमनेरमध्ये शक्ती लावणार का?

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आ .बाळासाहेब थोरात आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे हे नगर जिल्ह्यातील नेतृत्व. एकाच पक्षात असताना आणि विरोधी पक्षांत असतानाही एकमेकांच्या राजकीय 'बालेकिल्ल्यां'ना धक्का लागू न देण्याचे तत्त्व पाळत दोन्ही नेत्यांनी नगरचे राजकारण संतुलित ठेवले. मात्र, लोकसभा निवडणुकीत डॉ.सुजय विखे यांच्याविरोधात थोरातांनी आपली ताकद लावल्यानंतर या 'समझोत्या'ला धक्का बसला असून आता विखेही थोरात यांच्या संगमनेरमध्ये आपली शक्ती लावण्याची शक्यता आहे. यात आता सुजय विखेंनी तिथून विधानसभा लढण्याची तयारी दर्शविल्याने या मतदारसंघात चुरस रंगण्याची शक्यता आहे, ही लढत झाली तर संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष संगमनेरवर राहिल.

### ..तर कर्डिले यांचे काय ?

माजी आमदार शिवाजीराव कर्डिले यांनी राहुरी विधानसभा मतदारसंघातून दोनदा निवडणूक लढविली होती. पहिल्या निवडणुकीत त्यांनी विजय मिळविला तर दुसऱ्या निवडणूकीत त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.कर्डिले व विखे एकाच पक्षात आहेत. राहुरी विधानसभा डोळ्यासमोर ठेवून कर्डिले यांनी लोकसभा निवडणुकीत डॉ.विखे यांचे प्रामाणिकपणे काम केले. मात्र आता डॉ.विखे यांनीच राहुरीच्या जागेवर दावा केल्याने कर्डिलेंचे काय ? असा प्रश्नही उपस्थित होत आहे.

# अण्णाभाऊंचे साहित्य परिवर्तनाला चालना देणारे

## खा. नीलेश लंके यांचे प्रतिपादन



■ शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून खा. नीलेश लंके यांनी अभिवादन केले.

नवी दिल्ली : प्रतिनिधी

**अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरल्याचे नमुद करतानाच महाराष्ट्राच्या जडण घडणीत आणि परिवर्तनात या साहित्याचे योगदान महत्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन खासदार नीलेश लंके यांनी केले.**

नवी दिल्लीतील महाराष्ट्र सदन येथे अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी खा. लंके यांनी साठे यांच्या कार्याला उजाळा दिला.खा. बजरंग सोनवणे, अनिल गंधाक्ते आदी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रूजविण्याचे काम अण्णाभाऊ साठे, अमर शेख आणि शाहीर द.न.गव्हाणकर यांनी केले. साठे यांच्या पोवाडा आणि लावणी यांसारख्या लोक कथात्मक कथा शैलीच्या वापराने लोकांमध्ये ते लोकप्रिय बनले व त्यांचे कार्य अनेक समुदायांपर्यंत पोहचण्यास मदत झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीला अर्पण केलेल्या फकीरामध्ये साठे यांनी आपल्या समुदायाला पूर्ण भुकमारीपासून वाचविण्यासाठी ग्रामीण रूढीवादी प्रणाली आणि ब्रिटीश शासनाच्या विरूध्द विद्रोह करणा-या नायक फकीराला चित्रीत केल्याचे खा. लंके म्हणाले. मुंबईमधील शहीर पर्यावरणाने त्यांच्या लिखाणावर लक्षणिय प्रभाव टाकला. त्यांनी त्यांच्या मुंबईची लावणी आणि मुंबईचा गिरणीकामगार या दोन गाण्यांमधून दुर्व्यवहारी, शोषणकारी, असमान आणि अन्यायपुर्ण असे नमुद केले असल्याचे लंके यांनी सांगितले.

लंके पुढे म्हणाले, अण्णाभाऊंनी सर्वसामान्यांना सहज समजेल अशा ग्रामीण भाषेतून शाहीरी करत त्यांनी आयुष्यभर वंचितांसाठी समाजप्रबोधन केले. जाती व्यवस्था आणि गरीबीमुळे ते शिक्षण घेऊ शकले नाहीत. मात्र अवघ्या दिड दिवसांची शाळा शिकलेल्या अण्णाभाऊंनी साहित्य क्षेत्रात मोठी झेप घेतली. लेखणी आणि प्रतिभेच्या जोरावर त्यांनी अनेक पुस्तके लिहिल्याचे खा. लंके म्हणाले.

# ताई तू काळजी करू नकोस..!

## ■ मुख्यमंत्र्यांकडून लाडक्या बहीणींना दिलासा
## ■ योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत वाढवली



मुंबई : प्रतिनिधी

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील महिलांसाठी एक खास व्हिडिओ जारी केला आहे. ताई तू काळजी करू नकोस म्हणत त्यांनी लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज करण्याची मुदत वाढवली आहे. योजनेसाठी राज्यभरातील महिलांची वाढती गर्दी आणि प्रतिसाद पाहून सरकारने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता महिलांना ३१ ऑगस्ट २०२४ पर्यंत या योजनेसाठी अर्ज करता येणार आहे. मुख्यमंत्री कार्यालयाकडून या संदर्भात एक व्हिडिओ जारी करण्यात आला आहे.**

**मुख्यमंत्री शिंदे यांचा व्हिडिओ नेमका काय?**

या व्हिडिओमध्ये मुख्यमंत्री शिंदे यांनी राज्यभरातील लाडक्या बहिणींना साद घातली आहे. शिंदे म्हणाले, ताई, तुमच्यासाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आम्ही सुरू केली. त्याला तुम्हा सर्वांचा भरभरुन प्रतिसाद मिळतोय, त्याबद्दल मनापासून धन्यवाद, ताई कुणाला किती विरोधात बोलू दे, तू काळजी करू नकोस, राज्यातील महायुती सरकार तुझ्या पाठीशी भक्कमपणे उभं आहे. तुझ्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी, आरोग्यासाठी, पोषणासाठी उर्वरीत पान ३ वर

# विधानसभे आधीच महाविकास आघाडीत बिघाडी?

## ■ काँग्रेसचा थेट ठाकरे गटाच्या जागांवर दावा
## ■ वादाची ठिणगी पडण्याची शक्यता

मुंबई : प्रतिनिधी

**येत्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष जोमाने कामाला लागले आहेत. भाजप, मनसेपाठोपाठ आता काँग्रेस पक्षाकडूनही जोरदार मोर्चेबांधणी केली जात आहे. आगामी विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने काँग्रेसकडून जोरदार तयारी सुरु आहे. त्यातच आता काँग्रेसने महाविकासआघाडीचे घटक पक्ष असलेल्या शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या काही जागांवर दावा केला आहे. त्यामुळे महाविकासआघाडीमध्ये बिघाडी झाल्याचे दिसत आहे.**



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्ष जोरदार तयारीला लागला आहे. सध्या काँग्रेसकडून मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघाची चाचपणी केली जात आहे. मुंबई काँग्रेसकडून मुंबईतील सर्वच ३६ मतदारसंघात निरीक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. हे सर्व निरीक्षक या मतदारसंघाचा उर्वरीत पान ३ वर

# सुजयदादा पारनेरमधूनच लढा!

## जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी रोकडे यांची साद

पारनेर : प्रतिनिधी

**नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात डॉ. सुजय विखे यांचे मोठे संघटन असून त्यांनी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत पारनेर मतदारसंघातून निवडणूक लढवावी अशी आता कार्यकर्त्यांकडून मागणी करण्यात येत आहे. पारनेर- नगर विधानसभा मतदारसंघात डॉ.सुजय विखे यांनी कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी विधानसभा निवडणूक लढवावी अशी मागणी भाजपा किसान मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी रोकडे यांनी प्रसिध्दी पत्र काढून केली आहे.**

यामध्ये शिवाजी रोकडे यांनी म्हटले आहे की माजी खासदार सुजय विखे यांचे पारनेर नगर विधानसभा मतदारसंघात मोठा कार्यकर्त्यांचा समूह आहे. परंतु एका मंचावर सर्वांना जमा करून माजी खासदार सुजय विखे यांनी निवडणूक लढविल्यास सुजय विखे पारनेर विधानसभा मतदारसंघात आमदार होतील व खऱ्या अर्थाने लोकसभेला झालेल्या पराभवाचा बदला घेतल्याचे समाधान कार्यकर्त्यांच्या चेहऱ्यावर दिसून येईल असं मत यावेळी जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी रोकडे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.



पारनेर नगर विधानसभा मतदारसंघात खासदार असताना त्यांनी अनेक विकासाची कामे मार्गी लावली आहेत त्या विकास कामांच्या जोरावरच खऱ्या अर्थाने सर्वसामान्य जनता सुजय विखे यांना पारनेर नगर विधानसभा मतदारसंघात आमदार केल्याशिवाय शांत बसणार नाही या ठिकाणी पक्ष संघटनेमध्ये असलेले एकीचे बळ दाखवून देण्यासाठीच माजी खासदार सुजय विखे यांनी आता मतदारसंघातून आमदारकीला उमेदवारी करणे गरजेचे आहे की खऱ्या अर्थाने सर्वसामान्य कार्यकर्त्यांची व विखे समर्थकांची इच्छा असून सुजय विखे हे जर पारनेर नगर विधानसभा मतदारसंघात आमदार झाले तर लोकसभेला झालेला पराभव हा खऱ्या अर्थाने बदला ठरणार आहे. असेही यावेळी भाजप जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी रोकडे यांनी सांगितले.

# रांजणगाव एमआयडीसीला गुंतवणूकदारांचा ठेंगा!

## ■ राज्यात ८१ हजार १३७ कोटी रुपये गुंतवणुकीच्या प्रकल्पांना मान्यता
## ■ विदर्भ मराठवाड्याला गुंतवणूकदारांची पसंती

शिरुर : सतीश डोंगरे

**राज्यातगुंतवणूकदारांचाओघ वाढत असून ८१ हजार १३७ कोटी रुपये गुंतवणुकीच्या सात प्रकल्पांना मंगळवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. गुंतवणूक करण्यासाठी रांजणगाव एमआयडीसीकडे मात्र गुंतवणूकदारांनी पाठ फिरविल्याचे चित्र आहे.**




शासनाने रांजणगाव एमआयडीसीच्या तिसऱ्या टप्प्यात कर्डे परीसराला इलेक्ट्रॉनिक हब म्हणून जाहीर केले आहे. आगामी काळात या परिसरात ७०० एकरवर इलेक्ट्रॉनिक्स कंपन्या मोठी गुंतवणूक करतील त्यातून रांजणगाव एमआयडीसीला राज्यात एक नवी ओळख प्राप्त होईल असे दोन वर्षांपूर्वी सांगण्यात आले होते. प्रत्यक्षात अद्याप १२०० कोटी रुपये गुंतवणूकीच्या रेफ्रीजरेटर बनविणाऱ्या आयएफबी आणि स्टेरिऑन या दोनच कंपन्या कार्यरत आहेत.

महाराष्ट्रात येऊ घातलेल्या प्रकल्पात उच्च तंत्रज्ञानावर आधारित लिथियम बॅटरी, इलेक्ट्रील व्हेईकल, सोलर पीव्ही मॉड्युल्स आणि इलेक्ट्रोलायझर, फळाचा पल्प निर्मिती प्रकल्पांचा समावेश असून रांजणगाव एमआयडीसीकडे पाठ फिरवित या कंपन्यांनी कोकणसह मराठवाडा, विदर्भ या भागाला पसंती दर्शविली आहे.

आवाडा इलेक्ट्रो कंपनीचा सोलर पीव्ही मॉड्युल्स आणि इलेक्ट्रोलायझरचा एकात्मिक प्रकल्प अतिरिक्त एमआयडीसी, बुटीबोरी उर्वरीत पान ३ वर










# तंत्रमंत्र
विज्ञानयुगातील बितंबातम्या


# AI अन् AGI

**सध्या जगभरात कृत्रिम बुद्धीमत्तेची (AI) जोरदार चर्चा सुरू आहे. दिवसेंदिवस त्यामध्ये नवनव्या सुधारणा होत असल्याचे दिसून येत आहे. ओपन एआय कंपनीचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी आर्टिफिशियल जनरल इंटेलिजेन्स (AGI)च्या विकासासाठी अब्जावधी डॉलर्सची गुंतवणूक करण्याची तयारी दाखविली आहे. ते 'द वॉल स्ट्रीट जर्नल'ला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी ही माहिती दिली. सध्या अस्तित्वात असलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा (AI) अत्युच्च विकास म्हणून एजीआयकडे पाहिले जात आहे. दुसरीकडे तंत्रज्ञान क्षेत्रातील अनेक जागतिक कंपन्यांमध्ये यामुळे भीतीचे वातावरण पसरले आहे.**




## एआय आणि एजीआयमध्ये काय फरक आहे?

एआय (AI) आणि एजीआय (AGI) यामध्ये नक्कीच फरक आहे. मुख्य फरक आहे व्याप्ती आणि क्षमतेचा! एआय एखादी विशिष्ट कृती करण्यासाठी तुम्हाला मदत करू शकेल. उदाहरणार्थ- चित्र ओळखणे, त्यावर प्रक्रिया करणे, भाषांतर करणे वा तुमच्याबरोबर बुद्धिबळासारखा खेळ खेळणे. एआयकडून ही सगळी कामे मानवापेक्षा जलद आणि अचूक गतीने केली जात असली तरीही त्याची क्षमता तेवढ्या एखाद्या कृतीपुरतीच मर्यादित राहते. दुसऱ्या बाजूला एजीआय एखाद्या कृतीपुरते मर्यादित नाही. त्याची क्षमता आणि व्याप्ती एआयपेक्षा अधिक मोठी असेल. ते अगदी मानवी बुद्धिमत्तेप्रमाणे अचूकपणे एकाच वेळी अनेक कामे करू शकेल. त्यामुळेच एजीआयबाबतच्या घडामोडींकडे कृत्रिम बुद्धिमत्तेच्या विकासाचे अत्युच्च शिखर म्हणून पाहिले जात आहे. संशोधकांकडून एआयच्या क्षमतांमध्ये वाढ करण्याचे प्रयत्न आधीपासूनच केले जात आहेत. म्हणूनच नोव्हेंबर २०२२ मध्ये चॅटजीपीटीसारखे एआय माध्यम बाजारात आल्याबरोबर अल्पावधीतच इतके लोकप्रिय झाल्याचे दिसून आले. ते अगदी मानवी बुद्धिमत्तेप्रमाणेच मजकुरावर प्रक्रिया करू शकते, हेच त्यामागचे कारण आहे. तेव्हापासून एआय हा विषय अधिक प्रमाणात चर्चेला आला. सध्या त्यामधील संशोधनाला अधिकाधिक गती देण्यासाठी अब्जावधी डॉलर्स खर्च केले जात असल्यामुळे आता दिवसेंदिवस एआयची माध्यमे अधिकाधिक विकसित होत आहेत. एजीआय हे याच एआय विकासाचे अत्युच्च शिखर ठरेल, यात शंका नाही.




## एजीआय म्हणजे काय?

एजीआयमुळे एखाद्या मनुष्याला करता येईल असे कोणतेही काम मशीन अथवा सॉफ्टवेअरलाही करता येईल. त्यामध्ये तर्कवितर्क, सामान्य ज्ञान, कार्यकारणभाव इत्यादी मानवी कौशल्यांचा समावेश असेल. अगदीच सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर, एजीआयमुळे मशीनला मानवी बुद्धीप्रमाणेच काम करता येईल. मशीनदेखील माहीत नसलेल्या गोष्टी नव्याने शिकणे, नव्या अनुभवांमधून शिकणे आणि प्राप्त केलेली माहिती वापरात आणण्यासारख्या अनेक गोष्टी मानवाप्रमाणेच शिकू शकेल. मनुष्य त्याच्या अनुभवांमधून विविध गोष्टी शिकतो. घर, शाळा वा इतर ठिकाणांमधून त्याला बऱ्याच गोष्टी शिकायला मिळतात. एखाद्या गोष्टीचे निरीक्षण करून वा लोकांशी संवाद साधून वा पुस्तके, टीव्ही अशा माध्यमांतूनही त्याची जडणघडण होते आणि त्याच्या मेंदूचा विकास होतो. त्यानंतर मनुष्याचा मेंदू विविध अडचणींवर मार्ग काढण्यासाठी या सगळ्या अनुभवांतून प्राप्त झालेल्या माहितीचा वापर करतो. एजीआयमुळे एखादे सॉफ्टवेअर अथवा मशीनदेखील अगदी हीच क्षमता प्राप्त करू शकेल. कृत्रिम बुद्धिमत्तेचा एवढा विकास प्रत्यक्षात आणण्याचे संशोधकांचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे मानवी मेंदू ज्याप्रमाणे काम करतो अगदी तसेच काम एजीआयमुळे मशीनलाही करता येऊ शकेल, या दृष्टीने संशोधक काम करीत आहेत. म्हणजे कुशाग्र बुद्धिमत्तेचा यंत्रमानव अगदी माणसासारखाच तुमचा मित्र असेल. तो तुम्हाला काय म्हणायचे आहे ते अगदी सहजपणे समजून घेऊ शकेल, नव्या गोष्टी शिकू शकेल आणि एखाद्या समस्येवर त्याच्या बुद्धिमत्तेने उपायही काढू शकेल.




## ही पूर्णपणे नवी कल्पना आहे का?

नाही. ही पूर्णपणे नवी कल्पना आहे, असे म्हणता येणार नाही. २० व्या शतकात पहिल्यांदा एजीआयची संकल्पना मांडण्यात आली होती. कृत्रिम बुद्धिमत्तेचे जनक मानल्या जाणाऱ्या ॲलन ट्युरिंग यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये सर्वप्रथम ही संकल्पना मांडली होती. त्यांनी 'कॉम्प्युटिंग मशिनरी ॲण्ड इंटेलिजेन्स' (१९५०) या शोधनिबंधामध्ये यंत्रांची बुद्धिमत्ता मोजण्यासाठी 'ट्युरिंग टेस्ट' नावाची नवी संकल्पना मांडली होती. ट्युरिंग टेस्टनुसार एखादे मशीन जर माणसाबरोबर माणसाप्रमाणेच संवाद साधू शकत असेल, तर ते मानवी बुद्धिमत्तेचेच प्रदर्शन करीत असल्याचे द्योतक आहे, असे सांगण्यात आले होते. ट्युरिंग यांनी हा शोधनिबंध लिहिला तेव्हा कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास अजिबात झालेला नव्हता. इतकेच काय, संगणकही त्याच्या प्राथमिक अवस्थेत होता. मात्र, ट्युरिंग यांनी ही संकल्पना मांडल्यामुळे अशा प्रकारच्या यंत्रांच्या अस्तित्वाबाबतच्या चर्चांना सुरुवात झाली होती. मानवी बुद्धिमत्तेची क्षमता असणाऱ्या अशा यंत्रांच्या फायद्या-तोट्यांवरही चर्चा होऊ लागल्या.

## एजीआयचा मानवासाठी काय फायदा होऊ शकतो?

तात्त्विकदृष्ट्या एजीआयचे असंख्य सकारात्मक फायदे सांगता येऊ शकतात. उदाहरणार्थ- आरोग्याच्या क्षेत्रामध्ये एजीआयचा वापर केल्यास कमी कालावधीमध्ये अचूक पद्धतीने रोगाचे निदान, उपचाराची पद्धती आणि रुग्णपरत्वे औषधोपचारही निश्चित करता येऊ शकतात. इतक्या मोठ्या प्रमाणावर असलेल्या माहितीच्या विस्तृत साठ्याचे कमी कालावधीत विश्लेषण करून निर्णय घेणे ही मानवी बुद्धिमत्तेच्या पलीकडे जाणारी गोष्ट आहे. मात्र, एजीआयमुळे हे वास्तवात येऊ शकते.




अगदी अर्थकारणात आणि व्यवसायांमध्येही एजीआयचा वापर प्रभावीपणे केला जाऊ शकतो. एजीआयद्वारे सद्यःस्थितीतील बाजाराचे अचूक विश्लेषण करून अंदाज वर्तविण्याचे कामही सहजतेने होऊ शकते. शिक्षण क्षेत्राचे उदाहरण घेतल्यास, एजीआयमुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या अनोख्या गरजा पूर्ण करता येऊ शकतात. प्रत्येकाची क्षमता ओळखून, त्याच्या गरजेनुसार त्याला शिक्षण देण्याची व्यवस्था अस्तित्वात आणता येऊ शकते.

## संशयाचे वातावरण का?

एकीकडे एजीआयचे इतके फायदे सांगितले जात असताना दुसरीकडे मात्र त्याबाबत भीतीही व्यक्त केली जात आहे. एजीआय प्रणाली विकसित करण्यासाठी होणारा उर्जेचा वापर आणि ई-कचऱ्याच्या निर्मितीमुळे पर्यावरणावर होणारा परिणाम हा चिंतेता विषय आहे. एजीआयमुळे रोजगारामध्येही मोठ्या प्रमाणावर घट होऊ शकते; तसेच सामाजिक आणि आर्थिक विषमतेमध्येही प्रचंड वाढ होऊ शकते, असे म्हटले जात आहे. दुसरीकडे ज्यांच्या हातात एजीआयचे नियंत्रण असेल त्यांच्या हातात इतरांपेक्षा अधिक अधिकार येऊ शकतात. असे झाल्यास, त्यामुळे नव्या प्रकारच्या समस्या आणि व्यवस्था उदयाला येऊ शकते; ज्याची आपण कल्पनाही केलेली नसेल. जर मनुष्य एजीआय तंत्रज्ञानावर अधिकाधिक विसंबून राहू लागला, तर तो आपल्या मूलभूत मानवी क्षमता आणि कौशल्येही गमावून बसण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. एजीआय मानवी क्षमतेला ओलांडून त्याच्याही पुढे जाऊ शकते, हाच एजीआयबाबतचा सर्वांत मोठा धोका आहे. असे झाल्यास, मानवाला एजीआयच्या संभाव्य कृती समजून घेणे आणि त्यांचा अंदाज वर्तविणेही कठीण होऊ शकते. अनेक साय-फाय चित्रपटांमध्ये मानवाचे यंत्रमानवांवरील नियंत्रण सुटून, ते अधिक शक्तिशाली झाल्याचे चित्रण केले गेले आहे. चित्रपटांमध्ये असे यंत्रमानव मानवी कल्याणाच्या विरोधात जाताना दिसतात. अगदी तसेच काहीसे येणाऱ्या भविष्यात वास्तवात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. बीबीसीला २०१४ मध्ये दिलेल्या मुलाखतीमध्ये दिवंगत प्राध्यापक स्टीफन हॉकिंग म्हणाले होते, "कृत्रिम बुद्धिमत्तेचा संपूर्ण विकास झाला, तर मानवजातीचा अंतही होऊ शकतो." त्यामुळेच एजीआयचा विकास हा मानवी मूल्यांशी सुसंगत आणि मानवाच्या सुरक्षिततेला धरूनच व्हायला हवा. त्यासाठी अनेक विचारवंत मांडणी करताना दिसतात.

# 'ॲपल'चाही फोन हॅक होऊ शकतो!

ॲपलचा संपूर्ण व्यवसाय आपल्या फोन आणि कॉम्प्युटरमध्ये कोणीही घुसखोरी करू शकत नाही या विश्वासावर आधारित असल्याने त्यांच्यासाठी फोन हॅक होणे मोठे आव्हान बनले आहे.

जगातील सर्वात सुरक्षित मोबाइल फोन आणि कॉम्प्युटर बनवण्याचा दावा करणाऱ्या ॲपल या कंपनीने आपले उत्पादन वापरणाऱ्यां संदेश पाठवला आहे की, मर्सेनेरी स्पायवेअरद्वारे हेरगिरी सॉफ्टवेअरद्वारे त्यांचे फोन हॅक केले जाऊ शकतात, त्यामुळे वापरकर्त्यांनी सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. हा संदेश ॲपलने भारतासह ९१ देशांतील त्यांच्या ग्राहकांना ई-मेलद्वारे पाठवला आहे. हे सॉफ्टवेअर वादग्रस्त ठरलेल्या 'पेगासस' स्पायवेअरप्रमाणे आहे. सहा महिन्यांपूर्वीही ॲपलने भारतातील काही लोकांना त्यांचे फोन पेगाससचे लक्ष्य असू शकतात, असा इशारा दिला होता. यातील बहुतांश विरोधी पक्षांचे नेते होते, त्यामुळे याबाबत बराच गदारोळ झाला होता. पण सरकारच्या दबावाखाली ॲपलने आपला इशारा मागे घेतला. तथापि, या वेळी कंपनीने आपल्या ग्राहकांना अत्यंत गांभीर्याने सावध केले आहे. भारतातील काही वापरकर्त्यांना ११ एप्रिलला पहाटे साडेबाराच्या सुमारास धोका सूचना (थ्रेट नोटिफिकेशन) पाठवली गेली. यामध्ये म्हटले होते की, आपला फोन 'भाडोत्री स्पायवेअर'द्वारे लक्ष्य केला जात आहे. मात्र, या हेरगिरी सॉफ्टवेअरद्वारे ज्यांचे फोन हॅक करण्यात आले, त्यांची नावे त्यांनी उघड केलेली नाहीत. तथापि, जगभरात असे हल्ले होत असल्याचे कंपनीने मान्य केले आहे.



## ॲपल जगातील आघाडीची कंपनी

ॲपल ही तंत्रज्ञानाच्या विश्वातील जगातील सर्वांत आघाडीची कंपनी आहे. २००७ मध्ये पहिला आयफोन बाजारात आला. त्यानंतर आज दीड दशकानंतरची स्थिती पाहिल्यास जगभरात १.४७ अब्ज लोकांकडे ॲपलचा फोन आहे. जगात वापरल्या जाणाऱ्या स्मार्टफोनमध्ये ॲपलचा वाटा २१.६७ टक्क्यांहून अधिक आहे. अँड्रॉइडच्या स्मार्टफोनपेक्षा ॲपल फोनच्या किमती काही पटींनी अधिक असतात. त्यामुळे आयफोन वापरणे हे भारतात स्टेटस सिम्बॉल ठरले आहे. अधिक प्रमाणात पैसे देण्यामागे प्रतिष्ठेखेरीज आणखी एक कारण म्हणजे या फोनची सुरक्षितता. अँड्रॉइड प्रणालीपेक्षा ॲपलची आयओएस ही प्रणाली अधिक प्रगत, अद्ययावत आणि तुलनेने अधिक सुरक्षित मानली जाते. असे असूनही ॲपलचे अत्यंत सुरक्षित मानले जाणारे फोन हॅक होत असतील, तर मग अँड्रॉइडवर चालणाऱ्या इतर फोनच्या सुरक्षेची काय स्थिती असेल याची कल्पनाच न केलेली बरी! ॲपलने कबूल केले आहे की ही घुसखोरी कोणत्याही सामान्य सायबर चोराच्या आवाक्यातली नाही. कारण ज्या सॉफ्टवेअरद्वारे हा हल्ला केला जात आहे त्याची किंमत लाखो डॉलर्स आहे. ॲपल या सॉफ्टवेअरवर मात करण्यासाठी काही व्यवस्था करू शकेल की नाही हे येणारा काळच सांगेल, पण लोकांच्या गोपनीयतेमध्ये घुसखोरी केल्याबद्दल जगातील सर्व सरकारे आता पुन्हा निशाण्यावर येणार आहेत.

## नक्की काय होते?

पेगासेस हे सॉफ्टवेअर खरे तर एक प्रकारचे गुप्तहेर आहे. हे सॉफ्टवेअर कोणाच्याही फोनमध्ये गुपचूप इन्स्टॉल केले जाऊ शकते आणि त्यानंतर त्या फोनचा कॅमेरा, माइक इत्यादींवर नियंत्रण मिळवून तो संबंधित चोराला आपल्या पद्धतीने ऑपरेट करता येतो. सायबर सुरक्षा कंपनी कॅस्परस्कीच्या अहवालानुसार, पेगाससच्या मदतीने एन्क्रिप्टेड ऑडिओ आणि एनक्रिप्टेड संदेशदेखील वाचले जाऊ शकतात. एन्क्रिप्टेड केलेले संदेश असे असतात जे केवळ संदेश पाठवणाऱ्या आणि प्राप्तकर्त्यालाच माहीत असतात. ज्या कंपनीच्या प्लॅटफॉर्मवर मेसेज पाठवला जात आहे ती कंपनीदेखील पाहू शकत नाही किंवा ऐकू शकत नाही. पण पेगासस वापरून हॅकर त्या व्यक्तीच्या फोनशी संबंधित सर्व माहिती मिळवू शकतो. २०१९ पर्यंत हे फोनमध्ये व्हॉट्स ॲप मिसकॉलद्वारे देखील इंस्टॉल करता येत होते. आयफोनमध्ये, आयमेसेज या बगचा फायदा घेऊन ते इंस्टॉल केले जायचे. आता तर कंपनीने अधिकृतरित्या संदेश पाठवून इशारा दिल्यामुळे आयफोन वापरकर्त्यांच्या चिंता कमालीच्या वाढल्या आहेत. खुलेआम वापरकर्त्यांच्या स्मार्टफोनवर डल्ला मारला जात असेल तर तो गोपनीयतेच्या आणि खासगीपणाच्या अधिकाराचा भंग आहे. त्यामुळे सरकारने याबाबत गांभीर्याने लक्ष घालून सुरक्षिततेसंदर्भात पुढाकार घ्यायलाच हवा.



## आधी चिंता, त्यात आणखी भर...

सुमारे तीन वर्षांपूर्वी जेव्हा भारतात पेगाससचा वापर उघडकीस आला, तेव्हा बराच गदारोळ झाला होता. सर्वोच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल करण्यात आल्या. हे सॉफ्टवेअर इस्त्रायली सरकारने विकले असल्याचे स्पष्ट झाले आहे. विशेष म्हणजे याबाबत मखलाशी करताना इस्त्रायल सरकार म्हणते की, कोणत्याही स्वतंत्र व्यक्ती किंवा कंपनीला आम्ही ते विकत नाही; तर केवळ सरकारांनाच हे सॉफ्टवेअर दिले जाते. त्यामुळे हे प्रकरण अधिकच गंभीर बनले होते. सायबर गुन्हेगारी, हॅकिंगपासून ते डीपफेकपर्यंतच्या आधुनिक धोक्यांमुळे भारतासारख्या देशात आधीच चिंतेचे वातावरण आहे आणि यावर मात करणे सरकारसाठी मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत पेगासस, मर्सेनेरी यांसारख्या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून हेरगिरी आणि घुसखोरीचे प्रकरण सिद्ध झाल्यास ती अधिक गंभीर बाब ठरेल.

# Facebook खात्याचा पासवर्ड विसरलात का?

सध्या सोशल मीडिया ॲप्सचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. लोकांना घरी बसून मोकळ्या वेळेत सोशल मीडिया स्क्रोल करायला आवडते. फेसबुक वापरत नाही असा व्यक्ती तर शोधून सापडणार नाही. फेसबुक खाते नेहमी फोनवर लॉग इन केले जाते. परंतु काहीवेळा तुम्हाला तुमच्या फोन किंवा पीसी व्यतिरिक्त इतर डिव्हाइसवर Facebook लॉग इन करावे लागेल. अशा परिस्थितीत, बऱ्याच वेळा वापरकर्त्यांना त्यांचा पासवर्ड आठवत नाही आणि ते त्यांच्या खात्यात लॉग इन करू शकत नाहीत. तुम्हालाही अशीच समस्या असेल तर आज आम्ही तुम्हाला त्यावर उपाय सांगत आहोत. तुम्ही तुमचा फेसबुक पासवर्ड सहजपणे रीसेट करू शकता. यासाठी तुम्हाला फक्त तुमचा नोंदणीकृत ईमेल आयडी किंवा फोन नंबर लक्षात ठेवावा लागेल.



फेसबुक पासवर्ड कसा रिसेट करायचा ते स्टेप बाय स्टेप समजून घ्या...

## फेसबुक पासवर्ड कसा रीसेट करायचा...

- सर्वप्रथम तुम्हाला www.facebook.com वर जावे लागेल. यानंतर फेसबुक लॉगिन पेज ओपन करावे लागेल.
- त्यानंतर तुम्हाला तुमचा ईमेल आयडी टाकावा लागेल. त्यानंतर Forget Password वर क्लिक करा.
- आता एक नवीन स्क्रीन उघडेल ज्यामध्ये तुम्हाला तुमचा मेल आयडी किंवा तुमचा फोन नंबर टाकावा लागेल.
- आता तुम्हाला एका पृष्ठावर पुनर्निर्देशित केले जाईल ज्यामध्ये तुम्हाला तीन पर्याय मिळतील. यामध्ये Google खाते वापरा, ईमेलद्वारे कोड पाठवा किंवा संदेशाद्वारे कोड पाठवा.
- त्यानंतर तुम्ही कोणताही पर्याय निवडाल, तुम्हाला एक कोड दिला जाईल.
- नंतर स्क्रीनवर कोड प्रविष्ट करा.
- एक नवीन पृष्ठ उघडेल ज्याद्वारे तुम्ही तुमचा पासवर्ड बदलू शकाल.
- आता तुमच्या Facebook खात्याचा पासवर्ड रीसेट केला जाईल ज्याद्वारे तुम्ही तुमच्या Facebook वर सहज लॉगिन करू शकाल.



## शॉर्ट न्यूज

### आ. राम शिंदे यांच्या पाठपुराव्याला यश

■ **जामखेड :** कर्जत-जामखेड मतदारसंघात रस्त्यांचे जाळे मजबुत करण्यासाठी नेहमी सतर्क आणि दक्ष असलेल्या आमदार प्रा. राम शिंदे यांच्या पाठपुराव्यातून चोंडी ते निमगाव डाकू या प्रमुख रस्त्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा २ (संशोधन व विकास) या योजनेतून सरकारने मंजुरी दिली आहे. या रस्त्यासाठी सुमारे २ कोटी ७ लाख रूपयांचा निधी मंजुर झाला आहे. हा रस्ता मंजुर झाल्यामुळे या भागातील शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### शिर्डी येथे छावा संघटनेचे अधिवेशन संपन्न

■ **शिर्डी :** येथे छावा क्रांतिवीर सेनेचे १० वे राष्ट्रीय महाअधिवेशन मा. दुग्धविकास व पशुसंवर्धन मंत्री अर्जुन खोतकर, नरेंद्र अण्णासाहेब पाटील, शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे, भाजपा उद्योजक आघाडीचे प्रदीप पेशकर, ज्येष्ठ नेते राजेंद्र पिपाडा यांसह छावा क्रांतिवीर सेनेचे प्रदेश, विभाग सर्व जिल्ह्यांचे जिल्हाप्रमुख यांसह शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीमध्ये भर पावसात शिवशाहीर स्वप्निल डुंबरे यांच्या शाहिरी गजरात जल्लोषात अधिवेशन संपन्न झाले.

### दत्तनगर गावात डास प्रतिबंधक फवारणी करा

■ **श्रीरामपूर :** तालुक्यातील दत्तनगर गावात प्रभाग निहाय बंदिस्त गटार स्वच्छता व डास प्रतिबंधक फवारणी करा, या मागणीची निवेदन ग्रामसेवक रुबाब पटेल व सरपंच सारिका कुंकूलोळ यांना भीमशक्ती अध्यक्ष संदीप मगर यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यासह नागरिकांच्या विविध समस्यांचा लवकरच निपटारा करावा, अन्यथा संघटनेचे वतीने व दत्तनगर मधील नागरिकांना घेऊन आपल्याग्रामपंचायत कार्यालयासमोर तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

### ताई पवार यांना शौर्य पुरस्कार द्यावा

■ **कोपरगाव :** तालुक्यातील मंजूर येथे गोदावरी पात्रात वाहून जाणाऱ्या तीन पैकी दोघांचे प्राण आपल्या जीवाची बाजी लावून ताई छबूराव पवार यांनी वाचविले आहेत. महिला शक्तीची आणि इतर महिलांना अशा बिकट प्रसंगात सामोरे जाण्यासाठी धाडसाची प्रेरणा मिळण्यास ताईबाई यांचे उदाहरण मोठे ठरणार आहे. याची दखल घेऊन शासनाने ताईबाई यांना शौर्य पुरस्कार देण्यासाठी कार्यवाही करावी, अशी मागणी माजी आ. स्नेहलता कोल्हे यांनी केली आहे.

### अकोलेतील लिंगदेव येथे नवीन एमआयडीसी

■ **अकोले :** राज्यात नाशिक, अहमदनगर जिल्ह्यासह चार जिल्ह्यात नवीन एमआयडीसी स्थापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासंदर्भात परिपूर्ण प्रस्ताव तातडीने सादर करावेत तसेच राज्यात यापुढे नवीन एमआयडीसी उभारण्यासाठी किमान १०० एकर जमिनीची उपलब्धता करून द्यावी, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी येथे दिले. अहमदनगर जिल्ह्यातील लिंगदेव, अकोले येथील आदिवासी औद्योगिक समूह विकास योजना तसेच अमरावती जिल्ह्यातील वरुड येथे एमआयडीसीफ उभारण्यासाठीचे सविस्तर प्रस्ताव तातडीने सादर करा, असे सांगितले.

# आघाडीच्या नेत्यांची वक्तव्य दंगली घडविण्यासाठीच : ना.विखे

## मराठा आरक्षणाच्या संदर्भातही पवारांनी चूक मान्य करावी



**नगर : प्रतिनिधी**

**भाजपा नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संदर्भात उध्दव ठाकरे यांनी केलेले वक्तव्य वैफल्यग्रस्त आवस्थेतील असून,मुख्यमंत्री पदावर राहिलेल्या व्यक्तिला शोभा देणारे नाही.शदर पवार यांच्या पाठोपाठ उध्दव ठाकरेचे संपवून टाकण्याचे आलेले वक्तव्य दंगली घडविण्यासाठी असल्याचा थेट आरोप महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केला.**

माध्यमांशी बोलतांना मंत्री विखे पाटील म्हणाले की मुख्यमंत्री पदावर राहीलेल्या व्यक्तीला असे वक्तव्य शोभा देत नाहीत. परंतू सतेसाठी विचार गमावलेल्यांच्या तोंडी आशीच वक्तव्य येणार त्यांच्या कडून दुसरी कोणती अपेक्षा नाही आशी टिका विखे पाटील यांनी केली.

राजकारणात मतभेद असू शकतात पण भावनेच्या भरात आपण काय बोलतो याचे भानही उध्दव ठाकरे यांना राहू नये याचे आश्चर्य वाटते.राज्यात मणिपूरचा संदर्भ देवून जेष्ठ नेते शरद पवार यांनी केलेले वक्तव्य आणि आता उध्दव ठाकरे यांची भाषा राज्यात दंगली घडविण्यासाठी आहेत का असा सवालही त्यांनी उपस्थित केला. राज्यातील सर्व जनता देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून,आता राज्यात महायुतीला मिळत असलेला प्रतिसाद पाहाता महाविकास आघाडीला यश मिळणार नाही हे लक्षात आल्यानेच आशी वक्तव्य पुढे येवू लागली असल्याचे विखे पाटील म्हणाले.

मराठा आरक्षणाच्या संदर्भात सुध्दा आघाडीच्या तीनही पक्षाकडून भूमिका स्पष्ट केली जात नाही.काल उध्दव ठाकरे केंद्राकडे बोट दाखवून मोकळे झाले.पण तुम्ही मुख्यमंत्री असताना किंवा शरद पवार मुख्यमंत्री असताना मराठा आरक्षणाच्या संदर्भात काय केले हे एकदा तरी सांगावे असे थेट आव्हान देवून नामांतराच्या संदर्भात झालेली चूक जशी पवारांनी मान्य केली तशीच चूक मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मान्य करावी अशी मागणी मंत्री विखे पाटील यांनी केली.

# रांजणगाव औद्योगिक वसाहतीमधील कारखान्याचा कर ग्रामपंचायतींना मिळावा!

■ रांजणगाव गणपती, कारेगाव, ढोकसांगवी ग्रामपंचायतींची मागणी

■ उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मंत्रालयात बैठक



**शिरूर : प्रतिनिधी**

**रांजणगाव गणपती, कारेगाव, ढोकसांगवी या ग्रामपंचायतींच्या हद्दीतील औद्योगिक वसाहतीमधील कारखान्याचा कर ग्रामपंचायतीना मिळण्यासंदर्भात स्थानिक ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांसोबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत मंत्रालयात नुकतीच एक बैठक घेण्यात आली.**

ग्रामपंचायतीच्या हद्दीतील औद्योगिक वसाहतीमधील कारखान्यांमुळे बाधित गावांसाठी आर्थिक सहाय्य योजना अस्तित्वात आहे. त्याचा लाभ रांजणगाव गणपती, कारेगाव, ढोक सांगवी या बाधित गावांना मिळण्यासाठी एमआयडीसी कडून निधी मिळाला पाहिजे तसेच औद्योगिक परिसरातील ग्रामपंचायतींमध्ये रस्ते, गटारे आदी सुविधा उभारण्यासाठी निधी देण्यास एमआयडीसी सकारात्मक आहे. त्यामुळे यासाठीचा प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचना यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संबंधितांना दिल्या.

ग्रामपंचायत हद्दीतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रातील जमीन, इमारती व मालमत्ता यावरील सामान्य आरोग्य रक्षण उपकर (स्वच्छता कर) व दिवाबत्ती कर यासहित मालमत्ता कराची वसुली ग्रामपंचायतीच्या वतीने एमआयडीसी मार्फत करण्यात येते. त्यानुसार करापोटी मिळणारी ५० टक्के रक्कम ग्रामपंचायतीस देण्यात येते. मात्र एमआयडीसीमार्फत करापोटी वसूल करण्यात येणारी १०० टक्के रक्कम एम आय डी सी मधील कारखान्यांमुळे बाधित ग्रामपंचायतींना मिळण्याची मागणी रांजणगाव गणपती ग्रामपंचायतीने केली आहे. औद्योगिक वसाहतीमधौल कारखान्याचा कर संकलनाच्या तरतुदी संदभर्भातील निर्णय हा तत्कालीन मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. त्यामुळे याबाबत मंत्रिमंडळ स्तरावर चर्चा करावी लागेल, असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

बैठकीस सहकार मंत्री दिलीप वळसे-पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, पाणी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यासह आंबेगाव-शिरूर विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर पाटील, आंबेगाव- शिरूर राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष अमोल जगताप, आंबेगाव-शिरुर राष्ट्रवादी विदयार्थी कॉंग्रेसचे अध्यक्ष अजित कोहकडे, कामगार कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष तथा रांजणगाव गणपतीचे उपसरपंच श्रीकांत पाचुंदकर पाटील, रांजणगाव गणपतीचे ग्रामपंचायत सदस्य अनिल दुंडे, नेताजी फंड, अशोक शेळके, निलेशबापू लांडे, हर्षल गदादे, दिपक खैरे, संदीप गवारे यांच्यासह संबंधित यंत्रणांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# भेसळयुक्त दुध आढळुन आल्यास कडक कारवाई करा

■ ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे निर्देश ■ ३० रुपये दर देणे बंधनकारक



**नगर : प्रतिनिधी**

**दूध उत्पादक शेतकऱ्यांना तीस रुपये दर न देणाऱ्या संघावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. दुधातील भेसळ रोखण्यासाठी कडक उपाय योजना करण्यात येत असून, तक्रार येणाऱ्या दुध संकलन केंद्राची संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी अचानक तपासणी करावी. भेसळयुक्त दुध आढळुन आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्याचे निर्देश राज्याचे महसूल, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिले.**

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात शासन निर्णयाप्रमाणे दूध दर तसेच दुधभुकटी अनुदान योजना तसेच जिल्हास्तरीय दुध भेसळ समितीच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष शिवाजी कर्डीले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर, शिर्डीचे अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्रकुमार पाटील यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, जिल्ह्यातील प्रत्येक दुध संकलन केंद्रावर उच्चप्रतीच्या दुधाचे संकलन करण्यात यावे. दुधाच्या गुणवत्तेमध्ये कुठल्याही प्रकारची तडजोड स्वीकारली जाणार नसल्याचे स्पष्ट करत जिल्ह्याचा उत्तर व दक्षिण विभागामध्ये दुधाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी पथक गठित करण्यात येऊन त्यांच्यामार्फत दुधाची तपासणी करण्यात यावी. तपासणीमध्ये दुधामध्ये भेसळ आढळुन आल्यास संबंधितांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच दुधसंकलन केंद्रावर दुध देणाऱ्या शेतकऱ्यांना ३० रुपये प्रतीलिटर दर देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. जे केंद्र शेतकऱ्यांना ३० रुपयांचा दर देणार नाहीत, त्यांच्यावर सुद्धा कारवाई करण्याचे निर्देश देत प्रत्येक दुध संकलन केंद्रावर संकलित होणाऱ्या दुधाची माहिती मिळावी यासाठी विशेष ॲप तयार करण्याच्या सुचनाही पालकमंत्री श्री विखे पाटील यांनी यावेळी दिले.बैठकीस जिल्ह्यातील सहकारी दुध उत्पादक संघ व खाजगी दुध प्रकल्पाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

(पान १ वरून)

### ताई तू काळजी करू नकोस..!

तुला दरमहा दीड हजार रुपये म्हणजेच, वर्षाला १८ हजार रुपये देण्याचा निर्णय तुझ्या या भावाने घेतला आहे, असे शिंदे म्हणाले.

**३१ ऑगस्टपर्यंत अर्ज भरता येणार अर्ज**

तसेच या योजनेला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहून आणि नावनोंदणीसाठी झालेली गर्दी पाहून आम्ही अर्ज भरण्याची मुदत वाढवून ३१ ऑगस्ट केली आहे. ज्या भगिनी ३१ ला नोंदणी करतील, त्यांनादेखील जुलै महिन्यापासून लाभ देण्यात येणार आहे, असे मुख्यमंत्र्यांनी या व्हिडीओत स्पष्ट केले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी आता महिलांना ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज भरता येणार आहे. दरम्यान, या योजनेसाठी अर्ज करण्यात आलेल्या लाभार्थी महिलांना १ जुलै, २०२४ पासून दर माह रु.१५०० /- आर्थिक लाभ देण्यात येणार आहे.

### विधानसभे आधीच महाविकास आघाडीत बिघाडी?

आढावा घेणार आहे. हे निरीक्षक संपूर्ण मतदारसंघ फिरुन कोणत्या पक्षाचं स्थान बळकट आहे, कोणत्या उमेदवाराला पसंती आहे याचा आढावा घेणार आहेत. हा आढावा घेतल्यानंतर त्याचा संपूर्ण अहवाल तयार केला जाईल. यानंतर तो वरिष्ठांना पाठवण्यात येणार आहे.

काँग्रेसकडून १५ विधानसभा मतदारसंघावर दावा

तर दुसरीकडे काँग्रेसकडून मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघांपैकी १५ विधानसभा मतदारसंघावर दावा करण्यात येण्याची शक्यता आहे. मुंबईतील मलबार हिल, धारावी, भायखळा, वडाळा, अणुशक्ती नगर, चांदिवली या काही मतदारसघांवर काँग्रेस दावा करणार असल्याचे बोलले जात आहे. यातील काही मतदारसंघ हे ठाकरे गटाच्या वाट्याला आहे. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीतही महाविकासआघाडीमध्ये जागावाटपाची डोकेदुखी वाढणार असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.


### रांजणगाव एमआयडीसीला गुंतवणूकदारांचा ठेंगा!

जि. नागपूर आणि एमआयडीसी भोकरपाडा, ता. पनवेल जि. रायगड या परिसरात उभारण्यात येणार आहे. कंपनीमार्फत नवीकरणीय ऊर्जा स्रोताचा उच्च तंत्रज्ञानावर आधारित राज्यात प्रकल्प स्थापित होणार आहे. प्रकल्पामध्ये एकूण १३ हजार ६४७ कोटी एवढी गुंतवणूक होणार असून याद्वारे आठ हजार पेक्षा अधिक रोजगारनिर्मिती होणार आहे.गुंतवणूकदारांनी रांजणगाव एमआयडीसीकडे पाठ फिरविल्याने कर्डे - सरदवाडी परिसरातील स्थानिक जनतेत नाराजीचा सूर आहे.




# आदिवासी भागातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने मोठे नुकसान

## पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याची मागणी



**अकोले : प्रतिनिधी**

**तालुक्याच्या आदिवासी भागातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीने घरांचे आणि शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नुकसानींचे पंचनामे करून तातडीने आदिवासी शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी या भागातील सामाजिक कार्यकर्ते अनंत घाणे, तुकाराम खाडे यांनी केली आहे.**

आदिवासी पट्ट्यातील रतनवाडी, घाटघर, पाचनई, अंबित, एकदरे, शेणित, देवगाव, पिंपरकणेसह सर्व भागांत तीन-चार दिवसांपासून मुसळधार पाऊस होऊन अतिवृष्टीमुळे नदीनाले पाण्याच्या पुरामुळे भरून वाहत आहेत. या पुरामुळे वारंघुशी, डावखांडी येथील रस्त्यावरील छोटे पूल वाहून गेल्याने वाडी-वस्तीच्या जनतेचे हाल झाले आहे. तर भात शेतीचे बांध फुटले आहे. मुतखेल, कोलटेंभे, रतनवाडी आदी गावांसह शिंगणवाडी, जहागिरदारवाडी, बारीसह भंडारदरा पाणलोटक्षेत्रातील मोठ्या प्रमाणात भातशेती, घरांची पडझड होऊन नुकसान झाले आहे.

याबाबत माजी आमदार वैभव पिचड यांना माहिती दिली असता त्यांच्यावतीने तहसीलदार डॉ. सिद्धार्थ मोरे, तालुका कृषी अधिकारी अशोक साळी, गटविकास अधिकारी विकास चौरे यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून झालेल्या नुकसानींचे पंचनामे तातडीने करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अनंत घाणे, तुकाराम खाडे, उन्नती सेवा मंडळाचे अध्यक्ष भरत घाणे, अशोक भोजणे, तुकाराम सारूक्ते, मच्छिंद्र खाडे, सुभाष बांडे, बाजीराव सगभोर, रामदास पिचड, सागर रोंगटे, पांडुरंग पद्मेरे, दीपक भागडे आदिंसह शेतकऱ्यांनी केली आहे. त्यावरुन तहसीलदार डॉ. मोरे यांनी सर्व खात्यांना तातडीने पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.



# ऑफलाईन धान्य वितरणाचा आदेशच नाही

## ■ शुक्रवारपासून धान्य वितरीत होणार ■ रूपेश ढवण यांची माहिती

निघोज : प्रतिनिधी

**सर्व्हर डाऊन असल्याने गेली पंधरा दिवसांपासून स्वस्त धान्य दुकानदारांची मोफत धान्य वितरण व्यवस्था बंद पडली होती. मात्र शासनाने ऑफलाईन रेशन देण्याचा आदेश जरी या दुकानदारांना दिला असला तरी हे लेखी आदेश अद्याप प्राप्त झाले नाहीत. याबाबत आपली माती आपली माणसं या सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रुपेश ढवण यांनी स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष खंडू भुकन यांची भेट घेऊन गोरगरीब जनतेला हेलपाटे मारण्याची वेळ आली असून हे दुकाने त्वरित सुरू करावेत अशी मागणी केली यावेळी भुकन यांनी गुरुवार दि.१ रोजी तहसीलदार यांना भेटणार असून याबाबत शुक्रवार दि.२ रोजी दुकाने सुरू होतील असे आश्वासन दिले.**



याबाबत निघोज सोसायटी या ठिकाणी ढवण यांनी भेट दिली यावेळी त्यांचीही दुकान सुरू करण्यासाठी सकारात्मकता आहे. कामगार तलाठी काळे, सामाजिक कार्यकर्ते नानापाटील वराळ, युवा नेते अजय शेळके, माजी उपाध्यक्ष वसंत ढवण, संचालक शांताराम कवाद, संदीप वरखडे, प्रदिप औटी, संतोष वराळ, बबन लंके, पत्रकार आनंद भुकन, पारनेर तालुका पत्रकार संघाचे सदस्य जयसिंग हरेल, ग्रामपंचायत माजी सदस्य महादेव गजरे, भिवा वराळ, सचिन जाधव , अशोक शेटे , हर्षद ईधाटे, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याबाबत गुरुवारी ढवण यांनी तहसीलदार गायत्री सौदाणे यांच्याशी संपर्क केला यावेळी त्यांनी आज याबाबत चर्चा होऊन धान्य दुकानदार शुक्रवार पासून नियमित दुकाने सुरू करतील असे आश्वासन ढवण यांना दिले आहे. ढवण यांनी हे धान्य दुकाने सुरू होण्यासाठी जे प्रयत्न केले व गोरगरीब जनतेला न्याय देण्याची भूमिका घेतली त्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

### सर्व्हर डाऊनमुळे योजना ठप्प

मोफत धान्य ही सरकारची योजना लाखो कुटुंबांना आधार देणारी ठरणारी आहे. मात्र गेली पंधरा दिवसांपासून सर्व्हर डाऊन असल्याने ही योजना ठप्प झाली आहे. मात्र हे धान्य ऑफलाईन देण्याचे आदेश सरकारने दिले आहेत. असे असूनही स्वस्त धान्य दुकानदारांना यामध्ये तांत्रिक अडचणी असल्याने त्यांनी ऑफलाईन साठी विरोध केला आहे यासाठी कोणत्याही परिस्थितीत हे धान्य गोरगरीब गरजू यांना मिळाले पाहिजे यासाठी आम्ही व ग्रामस्थ यांनी गुरूवार दि.१ रोजी निघोज गावातील चारही दुकानदारांना भेटलो व आमची भुमिका मांडली तसेच तहसीलदार गायत्री सौदाने यांना संपर्क करुन जर शुक्रवार दि.२ पासून धान्य न मिळाल्यास आंदोलन करण्याचा इशारा दिला मात्र तहसीलदार यांनी काही झाले तरी शुक्रवार दि.२ पासून धान्य दुकानदार नियमीतपणे दिवसभर अखंड सेवा देऊन धान्य देतील अशी ग्वाही दिली.

**रुपेश ढवण**
संस्थापक अध्यक्ष,
आपली माती आपली माणसं

# रांध्याच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अनिल आवारी

## उपाध्यक्षपदी दत्तात्रय टावरे यांची निवड

रांधे : प्रतिनिधी

**जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रांधे येथील शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी अनिल रामचंद्र आवारी यांची तर उपाध्यक्षपदी दत्तात्रय टावरे यांची निवड करण्यात आली.**



शालेय समिती निवडीच्या सर्वसाधारण सभेदरम्यान पालक मेळाव्यामध्ये शाळेच्या विकासासंदर्भात अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. शाळेतील खोल्या दुरुस्ती असेल, सांडपाण्याचे व्यवस्थापन, शिक्षण शैली, नवनवीन उपक्रम, विद्यार्थ्यांचे आरोग्य संदर्भातील शिबिरे, खेळ क्षेत्र, विविध स्पर्धा परीक्षा तयारी व नियोजन अशा अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. नवनिर्वाचित अध्यक्ष, उपाध्यक्ष तसेच सर्व सदस्य यांनी सर्व ग्रामस्थांपुढे शाळेच्या विकासात्मक दृष्टिकोनातून सर्व समावेशक निर्णय घेण्याचे मान्य केले. विविध स्तरावरून शाळेच्या विकासासाठी निधी आणण्याचे काम स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मदतीने करू असे यावेळी अध्यक्ष अनिल रामचंद्र आवारी यांनी दिले.

या वेळी मा.सरपंच अरुण आवारी , विद्यमान सरपंच दिलीप आवारी ,माजी उपसरपंच संतोष काटे वि.कार्य. सेवा सोसायटीचे संचालक विनोद फापाळे, मा.चेअरमन बाजीराव आवारी, मा.चेअरमन पोपट भाऊ आवारी, साईनाथ झिंजाड , खेळ प्रशिक्षक श्रीराम सेतू आवारी, अमोल शिंदे, विजय झिंजाड, विनोद आवारी,रामकृष्ण आवारी, एकनाथ आवारी, राहुल साबळे, संतोष शिंदे, विकास पिंगळे, महेश आवारी, सोमनाथ आवारी, रामदास शेटे, विठ्ठल गोविंद आवारी, तुकाराम मार्तंड आवारी, हरून शेख, दशरथ पिंगळे, सनी चव्हाण,माया गायकवाड, मंगल वारे ,वर्षा पारधी, कौसर आरिफ तांबोळी, राजश्री गणेश आवारी ,अश्विनी सरोदे,अपेक्षा आवारी आणि शिक्षक वर्ग श्री.वसंत सोनवणे गुरुजी,रवींद्र चौधरी सुप्रिया दाते, शेंडकर सर, शिर्के मॅडम, आदी उपस्थित होते.

# चोंभूत ग्रामपंचायतच्या वतीने दिव्यांग ग्रामनिधीचे वाटप

## अण्णाभाऊ , लोकमान्यांना अभिवादन



चोंभूत : प्रतिनिधी

**चोंभूत ग्रामपंचायत येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त गावातील दिव्यांग व्यक्तींना सन -२०२३-२४ तसेच २०२४-२५ मधील उपलब्ध झालेला दिव्यांग ग्रामनिधी तील ५% निधीचे वाटप करण्यात आले.तसेच लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी निमित्त दिव्यांग पांडुरंग निवृत्ती कोल्हे यांच्या हस्ते प्रतिमांना अभिवादन करण्यात आले.**

यावेळी सरपंच सौ. कांचन म्हस्के ग्रामसेवक. एच. एस भालेराव , माजी मुख्याध्यापक रेवजी शिगदाळे गुरुजी , उत्तम म्हस्के, भाऊ कोल्हे,बाळु पारखे, ग्रामपंचायत सदस्य स्वप्निल पारखे , संदिप पाडेकर, अशोक म्हस्के, चंदू शिंदे, माजी उपसरपंच दत्तात्रय म्हस्के तसेच उपस्थित दिव्यांग बांधव उपस्थित होते.

### एमईटी स्कूलमध्ये रंगली नृत्य स्पर्धा

# स्पर्धांमधून भावी कलाकार घडतील : पठारे

सुपा : प्रतिनिधी

**पारनेर तालुक्यातील सुपा येथील माऊली एज्यूकेशन संचलित एमईटी इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये बुधवार दि.३१ जुलै रोजी विद्यार्थ्यांची नृत्य स्पर्धा मोठ्या उत्साहात आणि धामधूमीत पार पडली. विद्यार्थ्यांच्या भविष्यातील नेतृत्वगुणांना वाव देण्यासाठी तसेच त्याच्यांतील कलाकार ओळखण्यासाठी ह्या स्पर्धा खरोखरच महत्वाच्या ठरत आहेत.**




या स्पर्धा प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष अनिकेत पठारे , प्राचार्या सौ. मोनाली अनिकेत पठारे , उपप्राचार्या सौ. अनिता शर्मा , समन्वयक सरिता मॅडम तसेच सर्व शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमादरम्यान अनिकेत पठारे यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन आंतर शालेय स्पर्धांचे महत्व विद्यार्थ्यांना सांगितले. तसेच या स्पर्धांमधून उद्याचे भावी कलाकर घडणार आहेत तसेच सर्वांगीण विकास करण्यासाठी ही एक उत्कृष्ट संधी असल्याचेही त्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्पर्धा खूप महत्वाच्या असतात. या प्रक्रियेतून विद्यार्थ्यां मधील नेतृत्वगुण, निर्णयक्षमता, संघटन कौशल्ये इ. गुण विकसित होतात. या स्पर्धेत विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

यादरम्यान सर्व शिक्षक वृंद यांनी महत्वाची भूमिका पार पाडली, कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सौ.गौरी पवार व आश्वीनी सोनवणे यांनी केले. प्रमोद कनके यांनी आभार मानले.

# लव जिहाद घटनेतील आरोपी दाऊद शेखवर कारवाई करावी

## मनसे उपाध्यक्ष रवी रासकर यांची मागणी

सुपा : प्रतिनिधी

**नवी मुंबई मधील उरण या ठिकाणी कुमारी यशाची शिंदे या मुलीची यादी दाऊद शेख या इसमाने निर्घृण हत्या केली. त्या आरोपीवर लवकरात लवकर कठोर कारवाईसाठी पारनेर तालुका मनसेचे पारनेर तालुका उपाध्यक्ष रवी रासकर यांच्या नेतृत्वाखाली पोलीस स्टेशनला निवेदन देण्यात आले.**



राज्यात अशा घटना वारंवार घडत असताना या आरोपीवर कठोर कारवाई होण्यासाठी मनसे पारनेर तालुका उपाध्यक्ष रवीश रासकर, सुपा शहर उपाध्यक्ष संदीप चव्हाण, प्रवीण ठोकळ, वाघुंडे तंटामुक्ती अध्यक्ष प्रविण मगर, युवा नेते अनिल दिवटे, आणि महाराष्ट्र सैनिकांनी या आरोपीला लवकरात लवकर फाशी किंवा फाशीपेक्षाही मोठी सजा करण्यात यावी यासाठी निवेदन दिले आहे.

यावेळी रवी रासकर म्हणाले की, आम्ही राज ठाकरे यांच्या माध्यमातून ही लढाई चालू ठेवणार आहोत त्यामुळे लवकरात लवकर या जिहादी दाऊद शेख या इसमाला फाशीची शिक्षा करावी यासाठी मनसेने पोलीस स्टेशनला पोलीस अधिकारी विजय वेठेकर यांना निवेदन दिले.

# निघोजला अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळकांना अभिवादन

## ग्रामपंचायत कार्यालयात जयंती ,पुण्यतिथी साजरी



निघोज : प्रतिनिधी

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी निघोज ग्रामपंचायत कार्यालयात साजरी करण्यात आली.यावेळी सरपंच चित्राताई वराळ पाटील, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे मुख्य पदाधिकारी सतिष साळवे, मार्गदर्शक मोहन साळवे बाळासाहेब साळवे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.**

संतोष साळवे, गोरक्ष साळवे, वैभव साळवे, कैलास साळवे, अरुण साळवे , विष्णू साळवे, संजय साळवे , स्वप्निल साळवे , अशोक साळवे, राहुल साळवे, दत्ता आपटे, शुभम साळवे, शिवाजी वैरागर, साहिल कसबे, कुणाल कसबे , विकी साळवे , यश साळवे , दादू शिंदे , बापू शिंदे, आरिफभाई शेख, दत्ता ठुबे, सुजाता पांढरकर आदी उपस्थित होते.

सरपंच चित्राताई वराळ पाटील यावेळी म्हणाल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांनी शाहिरिच्या माध्यमातून लोकप्रबोधन करीत समाज संघटीत होण्यासाठी प्रयत्न केले आहेत. समाजाचा विकास हाच देशाचा विकास हे तत्व ठेऊन त्यांनी सर्वाधिक योगदान दिले आहे. लोकमान्य टिळक यांनी पत्रकारीता माध्यमातून जनतेला जागृत करीत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी मोठे योगदान दिले आहे. टिळक यांची पत्रकारीता जहाल होती त्यांनी खऱ्या अर्थाने इंग्रज सरकारला हादरे देत भारतातून इंग्रज सत्ता हद्दपार होण्यासाठी प्रयत्न केले असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोहन साळवे आभार गोरक्ष साळवे यांनी मानले.

# देवीभोयऱ्यात अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

## अण्णाभाऊंच्या साहित्यातून ग्रामीण लोकजीवन चित्रित । सुभाष वाढवणे यांचे प्रतिपादन

देवीभोयरे : प्रतिनिधी

**अण्णाभाऊ साठे यांनी दलित आणि मजूर लोकांच्या कथाव्यथा आपल्या शाहिरीतून आणि साहित्यातून मांडल्या आहेत. त्यांच्या साहित्यातून ग्रामीण लोकजीवन चित्रित झाले आहे. येथील देवीभोयरे ग्रामपंचायतीतर्फे साजऱ्या झालेल्या अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त येथील ग्रामस्थ सुभाष वाढवणे आपल्या भाषणात म्हणाले.**



येथील देवीभोयरे ग्रामपंचायतीतर्फे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. अण्णा भाऊंच्या तसबिरीला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

या प्रसंगी सुभाष वाढवणे पुढे म्हणाले, सध्या दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर अण्णा भाऊंच्या कथासाहित्यावर आधारित कृष्णाकाठच्या कथा ही सुंदर दूरदर्शन मालिका सादर होत असते. ती सर्वांनी जरूर पाहिली पाहिजे.

या कार्यक्रमात माजी सरपंच विठ्ठल सरडे, उपसरपंच शंकर सरडे, माजी पंचायत समिती सदस्य सुभाष बेलोटे, सामाजिक कार्यकर्ते बाबुराव मुळे, जगदंबा पतसंस्थेचे चेअमन तुकाराम बेलोटे, माजी उपसरपंच अण्णाशेठ मुळे, माजी पंचायत समिती सदस्य सुभाष बेलोटे, रावसाहेब वाढवणे, मंगेश मुळे, बाळासाहेब बेलोटे बाळासाहेब मुळे, अनिल बेलोटे, बाळू थोरात, भाऊ सरडे,संतोष बलोटे, गणेश बेलोटे, ज्ञानदेव मगर, बबन बेलोटे, दशरथ मुळे, सीतारामशेठ बेलोटे, संपतराव वाळुंज, प्रमोद आहेर, सचिन जाधव आदी ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# सुप्यासाठी मंत्री मुनगंटीवार यांच्याकडून भरीव निधी

## ■ सागर मैड यांची पत्रकार परिषदेत माहिती ■ सुप्यात वनविभागाच्या जागेत उभारले जाणार १० कोटींचे उद्यान

सुपा : प्रतिनिधी

**राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या आदेशाने पारनेर तालुक्यातील सुपा, सिद्धेश्वरवाडी, कोहोकडी या ठिकाणी सन २०२४-२५ या करिता राज्य योजना निसर्ग पर्यटन योजनेअंतर्गत नवीन बार्बीसाठी प्रस्ताव सादर करत पारनेर तालुक्याला भरीव निधी देण्याचे काम केले असल्याचे सागर मैड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.**




सुपा येथे पार पडलेल्या पत्रकार परिषदेत सागर मैड म्हणाले की, पारनेर तालुक्यातील सुपा गावात सागर मैड यांच्या मागणी व पाठपुराव्याने ९ कोटी ९६ लक्ष ३१ हजार रुपये निधी मंजूर झाला व सिद्धेश्वरवाडी या ठिकाणी विश्वनाथ कोरडे यांच्या पाठपुराव्याने ३ कोटी ४० लक्ष ९० हजार रुपये निधी मंजूर झाला व पंकज कारखिले यांच्या पाठपुराव्याने ३ कोटी ८ लक्ष ५५ हजार रुपये एवढा भरीव निधीस प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. नागपूर या ठिकाणी महाराष्ट्र विसर्ग पर्यटन विकास महामंडळ कार्यकारणी समितीची बैठक २३ जुलै रोजी पार पडली. या बैठकीत महाराष्ट्रातील अनेक मन उद्यानासाठी मंजुरी मिळाली आहे. सुपा शहरासाठी मंजूर वन उद्यान हे अतिशय महत्त्वाचा विषय असल्याने त्याकरीता जातीने अभ्यासपूर्वक पाठपुरावा करून हा निधी मंजूर करून घेतला असल्याचेही सागर मैड यांनी सांगितले

पुढे बोलताना मैड म्हणाले की, सुपा गावाचा वाढता विस्तार पाहता मागील अनेक दिवसापासून सुपा गावात नवनवीन विषय मांडून ते परिपूर्ण करण्यात आम्ही भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून करत आलो आहोत, सुपा वन उद्यान हे वाढत्या सुपा गावासाठी रहिवाशांसाठी संजीवनी ठरणार आहे. या वन उद्यानात प्रशस्त विस्तार करत लहान मुलांपासून ज्येष्ठांपर्यंत सेवांचा आनंद घेता येणार आहे. सुपा फॉरेस्ट गट नंबर ४०७ मध्ये हा उपक्रम होणार आहे. सुपा पिंपळगाव रोड खडकवाडीच्या पुढे हा फॉरेस्ट गट आहे. मागच्या काळात माजी खासदार सुजय विखे पाटील यांच्या पाठपुरावाने प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेने या रस्त्याचे उत्कृष्ट काम झाले आहे. त्या रस्त्याला लगत हा फॉरेस्ट गट नंबर ४०७ आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून लहान मुलांना खेळण्यासाठी बगीच्या, प्रौढांना बसण्याकरता प्रशस्त लॉन्स, बाकडे, फुलपाखरू बाग, बांबू गार्डन, बॉक्स गार्डन, हार्ड गार्डन, कॅटक्स गार्डन, सेल्फी पॉइंट, ब्रिज पिकनिक पॉईंट, प्राकृतिक जलस्रोत नियोजन, माहिती फलक त्यात विशेषतः सुपा गावाला मिळालेला ऐतिहासिक वारसा म्हणजे सरदार शाबूसिंग पवार यांचे माहिती फलक करण्याचा मानस आहे. अशा विविध बाबी यांचा समाविष्ट करण्याचा प्रयत्न आहे जेणेकरून सुभागासाठी या तालुक्यातच नाहीतर जिल्ह्यात ओळख निर्माण होणार असल्याचेही मैड म्हणाले.हा निधी मंजूर झाल्याबद्दल मंत्री मुनगंटीवार यांचे सुपा वासियांकडून मनापासून धन्यवाद व आभारही मैड यांनी मानले आहेत.

**महाराष्ट्रात भारतीय जनता पार्टी शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी महायुतीच्या सरकारच्या माध्यमातून सुपा गावास आत्तापर्यंत ७५ कोटी रुपये पेक्षा जास्त कामे आणता आली हे सुपा वासियांच्या आशिर्वादाने आम्हाला मिळालेले भाग्य आहे, आणि सुपा परिसरात आम्हाला मिळालेले भाग्य आहे. यापुढेही परिसरात अशी विकास कामे आणण्याचा प्रयत्न आम्ही करत राहू.**

**सागर मैड**
युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस भाजप.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com